**Publication:** Lokshahi Warta
**Date:** 10.09.2015
**Page:**12
**Headline:**S.F.S College wins TCS IT Wiz Nagpur edition

# ‘एसएफएस’ कॉलेजची ‘टीसीएस आयटी क्विझ’साठी निवड




**लोकशाही वार्ता/नागपूर**

आयटी क्षेत्रातील आघाडीवर असणारी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कन्सल्टिंग आणि व्यवसाय संदर्भातील तोडगे पुरवणाऱ्या कंपनीतर्फे ‘टीसीएस आयटी क्विझ’ या आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हील लाईन येथे नुकतेच पार पडले. या स्पर्धेत शहरातील विविध शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. ही स्पर्धा ८ ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी खुली होती. प्रादेशिक अंतिम भागातील ५ फेऱ्यांमध्ये प्रश्नाची अचूक उत्तर दिल्यानंतर एसएफएस ज्यूनियर कॉलेजच्या राहुल भगत व उदीत परमार या विद्यार्थ्यांनी हा पुरस्कार जिंकला.

प्रादेशिक फेरीतील विजेत्यांना ‘आयपॅड एअर’ मिळाला तर सेंटरपाईंट स्कूल वर्धमान नगरच्या शाळेतील अर्चित वेणुगोपालन व संचित खेडकर हे ‘रनरअप’ ठरले. त्यांना खास डिझाईनची ट्राफी, मेडल्ससह मिनी ऑयपॅड मिळाला. तसेच प्राथमिक फेरीनंतर अंतिम फेरीत प्रवेश मिळवलेल्या सहा स्पर्धकांना ‘टीसीएस’तर्फे लॅपटॉप बग्ज, हेडफोन, ब्ल्यूटुथसह सेल्फी स्टीक्स, सीपर आणि यूएसबी पेन ड्राईव्ह आदी बक्षीसं देण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे ‘टीसीएस’चे इंटर्नल आयटी अँड शेअर्स सर्व्हिसेस विभागाचे उपाध्यक्ष आणि ग्लोबल हेड आलोक कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. ‘टीसीएस आयटी विझ २०१५’ भारतातील अहमदाबाद, बेंगळुर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदूर, कोची, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर, पुणे, विशाखापट्टणम् येथे आयोजित करण्यात आले आहे. यावर्षीपासून प्रथमच ‘आयटी क्विझ’चे विशाखापट्टणम येथे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या फेरीमध्ये कम्प्युटिंग एव्हरिवेअर, कॉण्टेक्स्ट संपन्न यंत्रणा, अदृश्य ॲनालिटिक्स, गोष्टीचे इंटरनेट यांचा समावेश होता.